# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १५६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## शुक्रवार, दि. १९ मे, २०२३ दुपारी ०४:०० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची १५६ वी बैठक **शुक्रवार, दि.१९ मे, २०२३ रोजी दुपारी ०४:०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. प्रभारी कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

तसेच सदर बैठकीस मा. प्रभारी कुलगुरु तथा अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद यांच्या पूर्व परवानगीने दोन सदस्य ऑनलाईन उपस्थित होते.

सदर बैठकीस सदस्य हे ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजनीश कामत, प्रभारी कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ५) | प्रा. डॉ. गौतम सुबण्णा कांबळे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| १७) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १८) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | योगिनी घारे - कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

डॉ. राजनीश कामत हे प्रभारी कुलगुरु पदी रुजू झाल्यानंतर त्यांची ही पहिलीच बैठक असल्याने कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी विद्यापीठाच्या वतीने व सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच अधिष्ठांतामधून व्यवस्थापन परिषदेवर नव्याने नामनिर्देशित झालेले डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा व डॉ. वसंत गुरुशांत कोरे, प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरु महोदय यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील व डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रतिनिधी) यांनी दुरध्वनीद्वारे/पत्राद्वारे अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ. क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| ०१ | **दि. २९ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५५ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**<br><br>कुलसचिव यांनी दि. २९ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | **दि. २९ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५५ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| ०२ | **दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यंत (Lowest rung of Group "A") मधील पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: दिव्यांग-२०२२/प्र.क्र.८३/१६-अ, दि.२० एप्रिल, २०२३ रोजीचे शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदय यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**<br><br>टिपणी: उक्त शासन निर्णयान्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यंत (Lowest rung of Group "A") मधील पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबत खालीलप्रमाणे निकष दिले आहेत. ते खालीलप्रमाणे-<br>१) पदांची गणना- दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-ड मधून गट-ड मधील, गट-ड मधून गट-क मधील, गट-क मधून गट-क मधील, गट-क मधून गट-ब मधील, गट-ब मधून गट-ब मधील, गट-ब मधून गट-अ मधील निम्नस्तरापर्यंतच्या (Lowest rung of Group "A") नियुक्तीस योग्य ठरलेल्या पदांवर (Identified Posts) पदोन्नतीमध्ये ४% आरक्षण देण्यात यावे.<br>२) पदोन्नतीमध्ये एखाद्या संवर्गातील रिक्त पदाच्या ४% पदे दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित ठेवण्यात यावीत.<br>३) ज्या गट/संवर्गात (Group Cadre) सरळ सेवेने करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण ७५% पेक्षा जास्त नसेल, अशाच गट/संवर्गामध्ये दिव्यांग कर्मचा-यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण राहील.<br>४) एखाद्या विभागातील पद आरक्षित करणे शक्य होणार नसल्यास याबाबतीत सूट देण्याबाबतच्या तरतुदी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम-२०१६ च्या कलम २० (१) मध्ये नमूद केलेल्या आहेत.<br>५) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम-२०१६ च्या कलम २० (३) अनुसार दिव्यांगत्वामुळे कोणत्याही व्यक्तीला पदोन्नती नाकारता येणार नाही.<br>६) कोणत्याही दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना तात्पुरत्या दिव्यांगत्व प्रमाणपत्राच्या आधारे पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ देण्यात येवू नये. | विशेष कक्ष विभाग |

७) विचार क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीना अनारक्षित पदावर पदोन्नतीने समायोजित करणे- सेवाज्येष्ठतेने पदोन्नती देणे, निवडीने पदोन्नती देणे, मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षा / विभागीय परीक्षा मधून पदोन्नती देताना, पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध होत नसल्यास निकषात सूट देणे, बिंदूनामावली राखणे, पदोन्नतीसाठी बिंदूनामावली / स्वंतत्र नोंदवही ठेवावी. त्यामध्ये १, २६, ५१ व ७६ हे बिंदू दिव्यांगाकरिता सुनिश्चित करण्यात यावे.

८) दिव्यांगांसाठी आरक्षित पदे पुढील भरती वर्षात ओढणे व अंतर्गत परिवर्तनाने पदभरती करणे.

९) दिव्यांग कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करताना शासनाने वेळोवेळी केलेले पदोन्नती संबंधातील नियम, आदेश व निकष (उदा-पदोन्नती लगतच्यापदावरील किमान सेवेचा कालावधी, विहित विभागीय/सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा, गोपनीय अहवाल इ.) दिव्यांग कर्मचाऱ्यांने पूर्ण करणे आवश्यक आहे.

१०) प्रत्येक शासकीय / निमशासकीय आस्थापनेने किमान उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांनी संपर्क अधिकारी म्हणून नेमणून करावी. सामाजिक आरक्षणाची प्रकरणे हाताळणाऱ्या मागासवर्ग कक्षातील अधिकारी यांचेकडून दिव्यांगांच्या पदोन्नतीबाबतच्या प्रकरणांची तपासणी करण्यात यावी.

११) दि.०५/०७/२०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार सरळसेवा भरती/आरक्षण/अनुशेष ही माहिती सुचना फलकावर लावताना, त्यात दिव्यांगांच्या सरळसेवा/पदोन्नती साठी उपलब्ध पदांबाबत व अनुशेषाबाबतचा तपशील समाविष्ट करण्यात यावा.

वरीलप्रमाणे विद्यापीठ व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यंत (Lowest rung of Group "A") मधील पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबत उक्त शासन निर्णयान्वये कळविले आहे.

दि.२४/०४/२०२३ रोजीच्या मान्य टिपणीन्वये मा. कुलगुरु महोदय यांनी नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदचे बैठक नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदय यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने कार्यवाही करण्यास मान्यता दिली आहे.

उपरोक्त शासन निर्णय विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/विशेष कक्ष/२०२३/२७०६, दि. २९ एप्रिल, २०२३ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये कळविण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| | सबब, दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यंत (Lowest rung of Group "A") मधील पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: दिव्यांग-२०२२/प्र.क्र.८३/१६-अ, दि.२० एप्रिल, २०२३ रोजीचे शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदय यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव. | |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| ०३ | **उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि. १३/०४/२०२३ रोजीच्या ई-मेल समवेत प्राप्त पत्रात नमूद केल्यानुसार ॲड. सागर शंकरराव शिल्लेवार यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने विद्यापीठात 'डॉ. आंबेडकर स्कूल ऑफ पॉलिटिक्स' स्थापनेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: मा. श्री. प्र. ना. ढवळे, कक्ष अधिकारी (विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि. १३/०४/२०२३ रोजीच्या ई-मेल व त्यासमवेत जोडलेल्या पत्रान्वये पत्रात नमूद केल्यानुसार ॲड. सागर शंकरराव शिल्लेवार यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व विद्यापीठात 'डॉ. आंबेडकर स्कूल ऑफ पॉलिटिक्स' ची स्थापना करणेबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासना सादर करावा अशी विनंती केली आहे.<br>प्रस्तुत विद्यापीठाची स्थापना २२ जुलै, २००४ च्या राजपत्रानुसार झाली असून, सदर विद्यापीठास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून २F आणि १२B ची मान्यता प्राप्त झाली आहे. तर नुकतेच नॅक समितीने भेट देऊन विद्यापीठास 'B++ Grade' (CGPA २.९६) असे ग्रेड दिले आहे. सध्या विद्यापीठ परिसरात अकरा (११) संकुले असून, शासनाकडून "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र" आणि "महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र" अशा दोन (०२) अध्यासन केंद्रास प्रत्येकी ३ कोटी प्राप्त झाले आहेत.<br>सबब, शासनाने कळविलेनुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तद्नुषंगिक तरतुदीनुसार धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार व्यवस्थापन परिषदेस असल्याने, विद्यापीठात 'डॉ. आंबेडकर स्कूल ऑफ पॉलिटिक्स' सुरु करणेसंदर्भात निर्णय घेण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि. १३/०४/२०२३ रोजीच्या ई-मेल समवेत प्राप्त पत्रात नमूद केल्यानुसार ॲड. सागर शंकरराव शिल्लेवार यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने विद्यापीठात 'डॉ. आंबेडकर स्कूल ऑफ पॉलिटिक्स' स्थापनेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करुन पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.**<br>**समिती गठीत करणेसाठी सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे सर्वाधिकार मा.कुलगुरु यांना देण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| ०४ | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (c) नुसार एक अधिष्ठाता यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(c) नुसार स्थायी समितीवर खालीलप्रमाणे सदस्याचे नामनिर्देशन करण्याची आहे.<br>कलम ७०(३)(c)– व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेला एक अधिष्ठाता<br>वरील तरतूदीनुसार नामनिर्देशन करण्यासाठी दि.१३/०४/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विषय क्र.२ अन्वये कलम ७०(३)(c) नुसार एक अधिष्ठातामधून डॉ. सिद्राम नारायण सलवदे यांचे नामनिर्देशन करण्यात आले होते.<br>सद्य:स्थितीत डॉ. सिद्राम नारायण सलवदे यांच्याऐवजी डॉ. वसंत कोरे यांचे दि.०९/०५/२०२३ रोजीच्या आदेशान्वये, मानवविज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता म्हणून नामनिर्देशन करण्यात आले आहे. त्यामूळे डॉ. सिद्राम नारायण सलवदे यांचे प्रभारी अधिष्ठाता पद संपुष्टात आल्याने स्थायी समितीवर नव्याने नामनिर्देशित केलेल्या अधिष्ठातांमूधन व्यवस्थापन परिषदेकडून नवीन नामनिर्देशन करुन घ्यावे लागणार आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३)(c) नुसार एक अधिष्ठाता यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (c) नुसार, अधिष्ठातांमधून डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा व डॉ. वसंत गुरुशांत कोरे यांच्या नावांचे स्थायी समितीवरील सदस्यांकरिता प्रस्ताव आले. तथापि, डॉ. वसंत गुरुशांत कोरे यांनी माघार घेतल्याने डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्रभारी अधिष्ठाता यांचे सर्वानुमते स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| ०५ | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (२) (ख) नुसार, परिनियम समितीवर एक अधिष्ठाता यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (२) (ख) नुसार खालीलप्रमाणे सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे आहे.<br>कलम ७२ (२) (ख) - एक अधिष्ठाता<br>वरील तरतूदीनुसार नामनिर्देशन करण्यासाठी दि.१३/०४/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विषय क्र.३ अन्वये कलम ७२ (२) (ख) नुसार, एक अधिष्ठातामधून डॉ. शंकर दत्तात्रय नवले यांचे नामनिर्देशन करण्यात आले होते.<br>सद्य:स्थितीत डॉ. शंकर दत्तात्रय नवले यांच्याऐवजी डॉ. लक्ष्मीकांत दामा यांचे दि.०९/०५/२०२३ रोजीच्या आदेशान्वये, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता म्हणून नामनिर्देशन करण्यात आले आहे. त्यामूळे डॉ. शंकर दत्तात्रय नवले यांचे प्रभारी अधिष्ठाता पद संपुष्टात आल्याने परिनियम समितीवर नव्याने नामनिर्देशित केलेल्या अधिष्ठातांमूधन व्यवस्थापन परिषदेकडून नवीन नामनिर्देशन करुन घ्यावे लागणार आहे<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (२) (ख) नुसार, परिनियम समितीवर एक अधिष्ठाता यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (२) (ख) नुसार, एका जागेसाठी डॉ. वसंत गुरुशांत कोरे यांचे सर्वानुमते परिनियम समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| ६ (१) | दि.१९/०५/२०२३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.१९/०५/२०२३ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.<br><br>टिपणी: दि.१९/०५/२०२३ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.३२४ नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.१९/०५/२०२३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.१९/०५/२०२३ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | दि.१९/०५/२०२३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.१९/०५/२०२३ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| ६ (२) | विद्यापीठाचे निकाल जाहीर करण्यास उशीर झाला असल्यामुळे विद्यार्थी हिताचा विचार करुन परीक्षा अर्ज सादर करताना विलंब, अतिविलंब या प्रकारचे कोणतेही दंडात्मक शुल्क आकारु नये अशी दि.१९/०५/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विषय क्र.१७ अन्वये केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |
| ठराव: | विद्यापीठाचे निकाल जाहीर करण्यास उशीर झाला असल्यामुळे विद्यार्थी हिताचा विचार करुन परीक्षा अर्ज सादर करताना विलंब, अतिविलंब या प्रकारचे कोणतेही दंडात्मक शुल्क आकारु नये अशी दि.१९/०५/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विषय क्र.१७ अन्वये केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| ६ (३) | परीक्षा व मूल्यमापन मंडळासाठी विशेष कार्यासन अधिकारी (OSD) नियुक्त करण्यास दि.१९/०५/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विषय क्र.१९(२) अन्वये केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |
| ठराव: | दि.१९/०५/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विषय क्र.१९(२) अन्वये केलेली शिफारस विचारात घेऊन परीक्षा व मूल्यमापन मंडळासाठी डॉ. दीपक ननवरे यांची विशेष कार्यासन अधिकारी (OSD) म्हणून नियुक्ती करण्यास, त्यांना प्रती महिना ₹१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) इतके मानधन व प्रत्यक्ष प्रवास खर्च देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर

प्रा. डॉ. गौतम कांबळे यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| ६ (४) | परीक्षा व मूल्यमापन मंडळातील श्री. प्रज्योत दत्तात्रय फुटाणे, कंत्राटी संगणक लेखनिक यांना एकत्रित वेतनावर घेण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | सदरची बाब ही धोरणात्मक असल्याने ही व अशा रितीच्या सर्व निवेदनांचा विचार करण्यासाठी समिती गठीत करुन समितीच्या अहवालानंतर निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले.<br>समिती गठीत करणेसाठी सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे सर्वाधिकार मा.कुलगुरु यांना देण्यात आले. | |

श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| ६ (५) | अधिसभेत मंजूर झालेले छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्र सुरु करणेसाठी मान्य झालेले ठरावानुसार प्रस्ताव शासनास सादर करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | अधिसभेत मंजूर झालेले छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्र सुरु करणेसाठी यापूर्वीच प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले असल्याने याबाबत श्री. सचिन मारुती गायकवाड, श्री. सुधाकर तुकाराम सरवदे व प्रा. डॉ. गौतम सुबण्णा कांबळे यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करावा असे सर्वानुमते ठरले. | |

मा.प्रभारी कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद